या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार ५ ऑगस्ट २०२४ | अंक२३९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा


94036 41482

# बहिणींनो, काळजी करु नका, तरिही तुम्हाला पैसे मिळतील; देवेंद्र फडणवीसांनी काय शब्द दिला?

## शरद पवारांना टोला

**नागपूर भाजप जिल्हा विस्तारित कार्यकरींनी बैठक पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. तेव्हा बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. सोलरच्या माध्यमातून वीज जाणार दिली वीज चे काही दर वाढले होते. त्यातून सोलरची पंपची व्यवस्था केली. शरद पवारसाहेब विचारतात या योजनांसाठी पैसे कुठून आणणार? त्यांनी आधी राहुल गांधी यांना विचारावं ते खटाखात कुठून देणार होते, असा खोचक टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला आहे.**

लाडकी बहीण योजनेमुळे आपली मतं वाढणार आहेत. पुढच्या मार्च महिन्यापर्यंतचे लाडकी बहीण योजनेचे पैसे बजेटमध्ये ठेवले आहेत. काही लोक लाडकी बहीण विरोधात हायकोर्टात गेले होते. मात्र कोर्टाने त्यांची विनंती स्वीकारली नाही. ज्यांचे फार्म अपडेट झाले नाही. त्यांनीही काळजी करण्याची गरज नाही त्यांचे पुढच्या महिन्यात अपडेट झाले तरी पैसे मिळेल. आपण लेक लाडकी योजना आणली. त्यातून 1 लाख रुपये मिळणार आहेत. महाविकास आघाडी वाले रोज सांगतात गॅसचे भाव वाढले. पण आम्ही वर्षाला तीन सिलेंडर मोफत देणार आहोत. मुलींचं शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेतला, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी योजना आणली त्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. नागपूर जिल्ह्यात विकास गंगा गडकरी साहेबांच्या माध्यमातून आम्ही आणली. नळ गंगा योजना आम्ही आणली त्याला पुढच्या कॅबिनेटमध्ये मंजुरी मिळेल. माझ्या विदर्भाचं मी देणं लागत म्हणून मी सगळ्या योजना आणतो. मोठ्या प्रमाणात इन्व्हेस्टमेंट आपण विदर्भात आणल्या, असं फडणीस यावेळी म्हणाले



## राज्य सरकारच्या योजनांवर भाष्य

**तरुणांच्या हाताला काम मिळावं. म्हणून योजना आणली. त्यात 10 लाख विध्यार्थ्यांना फायदा होणार आहे. शेतकऱ्यांना केंद्रसोबत आपले 6 हजार दिले 1 रुपयात विमा उतरविला हा देशात रेकॉर्ड आहे. कापूस, सोयाबीनचे भाव कमी झाले. त्याच्यासाठी आपण निर्णय घेतला होता. मात्र मग आचारसंहिता लागली. आता ती मदत आपण करणार आहोत. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय केला. आपले निर्णय यांच्यासारखे नाहीत. निवडणूक झाले की बंद केलं... तर या योजना या पुढेही सुरुच राहणार आहेत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

## नीळकंठेश्वर मंदिरात आज महाप्रसाद



बीड (प्रतिनिधी) पहिल्या श्रावणी सोमवार निमित्त बीड शहरातील नीळकंठेश्वर मंदिरात सोमवारी (दि.5) महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रावण मासानिमित्त मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्रावण महिन्याची सुरुवात आजपासून होत आहे. श्रावणाच्या सुरुवातीलाच पहिला सोमवार आल्याने भाविकांच्या गर्दीने शहरातील शिवमंदिरे सकाळपासून गर्दीने फुलून निघणार आहेत. खासबाग परिसरातील नीळकंठेश्वर मंदिर हे बीड शहरातील प्रसिध्द शिवमंदिरांपैकी एक आहे. वर्षभर दर सोमवारी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक नीळकंठेश्वराचे दर्शन घेण्यासाठी येतात. श्रावण महिन्यात नीळकंठेश्वर मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आज पहिल्या श्रावण सोमवारी मंदिरात सकाळी 8 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन केले आहे. महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## मोदीबाग येथे मा.शरदचंद्र पवार साहेबंची, सदिच्छा भेट :-ॲड.अशोक बेदरे,किरण डावकर, संतोष पवार.

आष्टी,पाटोदा मतदारसंघातून मेहबूब भाई शेख यांनाच जनतेची पसंती



बीड प्रतिनिधी:-आज आमचे श्रद्धास्थान व देशाचे नेते आदरणीय खासदार मा. शरदचंद्र पवार साहेब यांच्या निवासस्थानी भेट घेऊन येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये आष्टी पाटोदा शिरूर कासार या मतदारसंघातून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख यांनाच जनतेची पसंती दिसून येत आहे असं वातावरण पूर्ण मतदारसंघात आहे याच्याबद्दल आदरणीय पवार साहेबांबरोबर चर्चा करण्यात आली आष्टी पाटोदा शिरूर कासार येथील सर्व जनता तर मेहबूब भाई शेख यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे परंतु आम्ही सर्व कार्यकर्ते जीवाची बाजी लावून यासाठी आम्ही सर्व रात्रंदिवस कष्ट करू आणि येणाऱ्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार साहेब यांच्या पक्षाचा उमेदवार निवडून आणू अशी ग्वाही दिली यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲडव्होकेट अशोक बेदरे, युवा नेते संतोष पवार, सामाजिक कार्यकर्ते किरण डावकर,ॲडव्होकेट किरण कोल्हे, व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## अनुसूचित जाती आणि जमातीतील वर्गीकरण सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा असंविधानिक-एड.सिद्धार्थ शिंदे

**बीड /प्रतिनिधी**

अनुसूचित जातीमध्ये देशांमध्ये एकूण १२०० जाती येतात त्यामधील ८०% जाती पूर्वीच्या अस्पृश्य जाती आहेत.हजारो वर्षापासून पिढ्या दर पिढ्या मनुवादी व्यवस्था कडून यांचे शोषण करण्यात आलेले आहे. अनुसूचित जातींना शिक्षणाचा अधिकार नव्हता अनुसूचित जातींना आर्थिक उत्पन्न मिळवण्याचा अधिकार नव्हता कोणतीही जमीन त्यांना नव्हती फक्त सवर्ण लोकांची सेवा करणे एवढेच जबरदस्तीने मनुवादी व्यवस्थेने लादण्यात आले होते. या अस्पृश्य लोकांना मूळ प्रवाहामध्ये आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३० ते १९३२ दरम्यान लंडन येथे झालेल्या गोलमेज परिषदेमध्ये ब्रिटिशासमोर अस्पृश्य समाजाच्या व्यथा आणि वेदना वास्तववादी स्वरूपात मांडल्या त्यामुळे गोलमेज परिषदेमध्ये अनुसूचित जाती अस्पृश्य समाजाची एक संघ सूची तयार करणे बाबतचा अधिकार बाबासाहेबांनी मिळवला या देशात प्रथमतः अनुसूचित जातीची सूची 1935 च्या इंडिया ॲक्ट प्रमाणे आली त्यानंतर संविधान सभेमध्ये अनुसूचित जातीची सूची तयार करण्यात आली त्यावर प्रश्न उत्तरे झाली वादविवाद झाला आणि अनुसूचित जातींची सूची ही भारतीय संसद अस्तित्वात येण्यापूर्वी तयार झालेली आहे या अनुसूचित जातींच्या सूची ला आणि अनुसूचित जातीच्या जमातीच्या सूची ला विशेष दर्जा बाबासाहेबांनी मिळवून दिलेला आहे देशभरात १२०० अनुसूचित जातीचे आणि अनुसूचित जमातीचे १००० अशी एकूण जवळपास २२०० जाती जमातीचे संघटन जमातीचे संघटन बाबासाहेबांनी नैसर्गिक संघटन गोलमेज परिषदेतून संघर्ष करून आणलेला आहे. देशातील जवळपास २२% हा समाज आहे ही एक खूप मोठी शक्ती आणि ताकद लोकशाहीमध्ये आहे. या ताकदीला विभागणी करण्यासाठी तोडा -फोडा आणि हुकूमत करा. या अन्यायकारक तत्त्वप्रणालीप्रमाणे हा निकाल देण्यात आलेला आहे सदरील निकाल हा भारतीय संविधानाच्या न्यायतत्त्वाच्या विरुद्ध आहे कारण अनुसूचित जातीची सूची करण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतींना देण्यात आलेला आहे अनुच्छेद ३४१ (२) प्रमाणे राष्ट्रपती फक्त अनुसूचित जाती आणि जमातीच्या सूचीमध्ये काही ही फेरबदल करू शकतो त्यामुळे दिनांक 1ऑगस्ट 2024 रोजी आलेला सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा असंविधानिक आहे. त्यामुळे राष्ट्रवादी दलित आघाडी महाराष्ट्र राज्य वरील सर्वोच्च न्यायालयाच्या निवडण्याचा विरोध करत आहे येणाऱ्या काळात मोठे जन आंदोलन या विषयावर छेडण्यात येणार आहे सर्वोच्च न्यायालयामध्ये पुनर्विचार याचिका दाखल करण्यात येणार आहे अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे संविधान रक्षक संयोजक एड. सिद्धार्थ शिंदे बीड यांनी दिलेली आहे.




श्री क्षेत्र कपिलधार येथे श्रावण मासानिमित्त तपोअनुष्ठान

## श्री श्री १०८ सद्गुरु शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांचे ३९ तपोअनुष्ठानास प्रारंभ



बीड प्रतिनिधी बीड पासून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र मन्मथ स्वामी मंदिर कपिलधार येथे श्रावण मासानिमित्त अनुष्ठानाचे आयोजन केलेले आहे. ही सन १९८५ पासूनची परंपरा असून, यावर्षीचे हे 39 वे अनुष्ठान आहे .श्रावण महिन्याच्या या पावन पर्व काळानिमित्त या अनुष्ठानामध्ये कीर्तन प्रवचन महापूजा बिलअर्चना,जंगम अर्चना शिवपाठ ,भारुड, शिवनाम अशा भरगच्च विविध कार्यक्रमाचे आयोजन संपूर्ण महिनाभर आयोजित केलेले आहेत. याबरोबरच या मंगल काळामध्ये शांती ,नवग्रह शांती, काळसर्प शांती ,अशा विविध कार्यक्रमाचे देखील आयोजन केलेले आहे तरी या पूर्वकाळामध्ये सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह कमिटीच्या वतीने करण्यात आलेली आहे महाराजांच्या अनुष्ठान कार्यक्रमासाठी आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा आदी विविध राज्यातून लाखो भाविक भक्त कपिलधार येथे उपस्थिती लावतात व या सर्व कार्यक्रमाचा आनंद घेतात शिवनामाच्या गजरामध्ये शिवमय होऊन संपूर्ण भक्तीमय परिसर झालेला असतो तरी या पावन पर्व काळामध्ये पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन समस्त सप्ताह कमिटी यांनी कळवले आहे.



## जयसिग सोळंके हेच प्रकाश सोळंके यांचे राजकीय वारस उमेदवारीने काका पुतण्याचा संघर्ष टाळला

माजलगाव - माजलगाव मतदार संघाची आमदारकीची कमान गेल्या 35 वर्ष निर्विवाद सोळंके कुटुंबीयांकडे आहे आ.प्रकाश सोळंके यांनी मतदार संघाला दिशादर्शक नेतृत्व देत विकासाचा आलेख वाढत ठेवला असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आ.प्रकाश सोळंके यांचे राजकीय वारस म्हणून जयसिग सोळंके यांची उमेदवारी जाहीर करून उभ्या महाराष्ट्रात झालेल्या काका पुतण्याच्या संघर्षाला ब्रेक लावण्याचे काम केले आहे. बीड जिल्ह्यातील प्रमुख मतदार संघ म्हणून माजलगाव मतदार संघ आहे या मतदार संघाला सोळंके कुटूंबियाने आपले एकहाती वर्चस्व प्रस्थापित करून आपली पकड कायम ठेवत विकासाचा आलेख उंचावत ठेवण्याचे काम सुरू ठेवली आहे आगामी विधानसभा निवडणुकीत सोळंके यांच्या कुटुंबियांतुन उमेदवार कोण असा वारंवार प्रश्न उभा राहत असताना आ.प्रकाश सोळंके यांनी स्वतः उमेदवारीतुन माघार घेत असल्याचे बोलत आपला राजकीय वारस हा त्यांचे पुतणे जयसिग सोळंके याना घोषित करून धक्का देण्याचे काम सद्यस्थितीत केले आहे.मुंडे,पवार काका पुतण्याचे भांडण उभ्या महाराष्टात माहीत आहे त्याचीच पुनरावृत्ती सोळंके कुटुंबियांत होते की काय अशी कुजबुज काही काळापासून सुरू असताना आ.प्रकाश सोळंके यांनी यावर पडदा टाकत आपला राजकीय वारस म्हणून पुतण्या जयसिग सोळंके यांची उमेदवारी जाहीर केली आहे.नवनेतृत्वाकडे सूत्रे देऊन आपण मार्गदर्शक भूमिकेत दिसणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विकास कामांना निधीची खैरात आ.प्रकाश सोळंके यांचे मतदार संघात सर्कल निहाय भेटीगाठी सुरू आहेत त्यात या भेटीगाठीत विविध विकासाकामाना निधी ची खैरात देण्यात येत आहे. येथे केली घोषणा आज रविवारी आ.प्रकाश सोळंके,जयसिग सोळंके याचा सर्कल निहाय दौरा सुरू होता पुरुषोत्तमपुरी,महातपुरी,किट्टीआडगाव या ठिकाणी दौरा करत असताना महातपुरी याठिकाणी आ.सोळंके यांनी आपला वारस म्हणून पुढील विधानसभेची सूत्रे हे जयसिग सोळंके या नव्या दमाच्या आणि नव्या पिढीच्या हाती सोपवली आहेत.

# श्री संत सावता महाराज दिंडी सोहळ्याने परळी नगरी दुमदुमली !,आज काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

**परळी / प्रतिनिधी**

श्री संत श्रेष्ठ सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त परळी येथील श्री संत सावता महाराज मंदिरात मागील सात दिवसापासून सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते आज शनिवारी शहरातून दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ज्ञानोबा तुकाराम यांच्या जयघोषाने अक्षरश: परळी शहर दुमदुमून गेले होते. सात दिवसापासून मोठ्या उत्साहात सुरू असलेल्या सप्ताहाची आज रविवारी काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. मागील शेकडो वर्षापासून सुरू असलेली परंपरा आजही माळी समाजाने मोठ्या उत्साहात कार्यान्वित ठेवली आहे 700 वर्षांपूर्वी सुरू झालेले श्री संत श्रेष्ठ सावता महाराज यांचे पुण्यतिथी समाधी सोहळा परळी



सह संपूर्ण महाराष्ट्रात भाविक मोठ्या उत्साहात साजरी करतात परिसरातील शेकडो वर्षापासून येथील श्री संत सावता महाराज मंदिरात तब्बल सात दिवस सप्ताहाचे आयोजन केले जाते या सर्व सात दिवसात महाराष्ट्रातील ख्यातना कीर्तनकार भागवताचार्य भजन गायक वादक यांच्या विविध धार्मिक कार्यक्रमातून सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा केला जातो माळी समाजासह या पंचक्रोशीतील सर्वच जाती-धर्माचे भाविक या सप्ताह सात ही दिवस मोठ्या उत्साहाने सहभागी होतात नाचतात गातात आणि कीर्तनाच्या रंगी तल्लीन होऊन जाता अशा धार्मिक आणि भावनिक साद घालणाऱ्या सप्ताह निमित्त येथील युवक मंडळाकडून सामाजिक



उपकरणे राबवली जातात यामध्ये रक्तदान शिबिर, शालेय विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप ,वृक्षारोपण याचे महत्त्व आधी सामाजिक कार्य या सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित केले जातात हा सत्ता केवळ धार्मिक कार्यक्रमाची मेजवानीचे नव्हे तर सामाजिक उपक्रमही तेवढ्याच मोठ्या प्रमाणात राबवल्या जाऊन समाजामध्ये एक आगळे वेगळे समाज प्रबोधन या माध्यमातून केले जाते विशेष म्हणजे महिलावर्ग मोठ्या प्रमाणात या सप्ताहामध्ये सहभागी होतात लहान बालक वृद्ध व्यक्ती या सप्ताहात तल्लीन होऊन जातात, आजच्या दिंडी सोहळ्याच्या आकर्षण म्हणजे शेकडो महिलांच्या डोक्यावरील तुळशी वृंदावन आणि कलश सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. विशेष म्हणजे ज्ञानोबा तुकाराम जयघोष आणि टाळ मृदंगाचा निनादाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सायंकाळी पाच वाजल्यानंतर श्री संत सावता महाराज मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले अंदाजे दहा हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला असल्याचे सांगण्यात येत दरम्यान कोणताही अनुचित प्रकार न घडता आजचा दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आज रविवार दिनांक 4 रोजी सकाळी 11 वाजता काल्याच्या कीर्तनाने या सात दिवस चालणाऱ्या सप्ताहाची सांगता होणार आहे तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोगाच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्रीक्षेत्र कपिलधार येथे प्रतिमाह २३ वी शिवरात्र उत्साहात साजरी

**बीड प्रतिनिधी**

बीड पासून जवळच असलेल्या संत शिरोमणी मन्मथ स्वामी संजीवन समाधीराजे येथे प्रतिमहा एकदिवशी शिवकिर्तन मासिकशिवरात्री निमित्त कीर्तन सेवा आयोजित केली जाते काल दि 3/8/24 रविवारी रोजी 23 वी शिवकीर्तन सेवा मोठ्या भक्तीमय वातावरणामध्ये संपन्न झाला. गेले 40 वर्षे शिवकिर्तन सखोल विवेचन अभंगावर करणारे संगीत विशारद वीरूपाक्ष आप्पा वैरागकर कानेगावकर ता.लोहारा जि.धाराशिव यांची एकदिवशीय



शिवकीर्तननीस्वार्थपाहीलीशुश्रावसेवाकेली. या कार्यक्रमात प्रति मासिकशिवरात्री कीर्तन सोहळ्यासाठी शि.भ. प आबा स्वामी कपिलधार डॉ.प्रशांत स्वामी, शंकर स्वामी महाराज जायफळकर,शि.भ.प.सौ. सरस्वतीताई स्वामी अंबाजोगाईकर, शि.भ.प.गुरुलिंग फुटके, शि.भ.प. राजकुमार लखदिवे, विश्वस्त सरपंच अश्रुबा रसाळ, विष्णुपंत वाघमारे, कानड्याप्पा राजाभाऊ तोडकर, गायक श्रीराम आंबेकर, सुनील गुजर, भागवत गोरे, मन्मथ लामतुरे, सिद्धू अंजना नागवसे, सुमन चलवदे, भाग्यश्री खडकी, संगीता तांबवे, पार्वती कोरे, मृदंगाचार्य सागर तसेच शिवनाम सप्ताह तीर मंडळी व हजारोसंख्येने शिवभक्त हजर होते अतिशय भक्तीने वातावरणामध्ये शिव कीर्तन सेवा संपन्न झाली.

## अक्षय ताकमोगे,अक्षय काळे यांची प्रशासकीय सेवत निवड झाल्याबद्दल सत्कार



सोलापूर/विश्वास चोपडे जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा कव्हे शाळेच्या वतीने अक्षय ताकमोगे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल व अक्षय सुभाष काळे यांची स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल शाळेच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी यश कल्याणी सेवाभावी संस्था करमाळा यांच्यावतीने घेण्यात आलेल्या इंग्रजी वकृत्व स्पर्धेत शाळेतील सहावीतील विद्यार्थी राजवीर विनोद ढेरे यांनी तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दल जि प प्रा शाळा कव्हे मुख्याध्यापक शिक्षक शाळा व्यवस्थापन समिती यांनी सत्कार केला.
यावेळी शाळेचे मुख्याध्यापक यादगिरकर सर्व शिक्षक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ ताकमोगे सचिव समाधान चोपडे शिक्षणतज्ज्ञ हर्षल वाघमारे, सदस्य दादा ढेरे,नितीन चोपडे,समाधान ताकमोगे, कैलास ताकमोगे, विकास ताकमोगे, विनोद ढेरे,संतोष चोपडे, परमेश्वर चोपडे, अशोक महादेव ढेरे,अशोक नांदे,प्रणित करंडे, भैरवनाथ शिंदे, आदी पदाधिकारी व विद्यार्थी पालकांची उपस्थित होती.

## आमदार संजय मामा शिंदे यांच्याकडून अक्षय ताकमोगे व अक्षय काळे यांचा सत्कार

**सोलापूर/विश्वास चोपडे**

माढा तालुक्यातील कव्हे येथील संतोष सोपान ताकमोगे यांचे सुपुत्र अक्षय संतोष ताकमोगे याची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल व सुभाष दत्तू काळे यांचे सुपुत्र अक्षय सुभाष काळे याची स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदी निवडीबद्दल गावागावात अनेक मान्यवरांनी व संस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.



करमाळा तालुक्याचे आमदार संजय मामा शिंदे यांना समजल्यानंतर त्यांनी दिनांक०४/०८/२०२४ रोजी कव्हे येथे बाळासाहेब ताकमोगे( पीएसआय ) यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली व अक्षय ताकमोगे व अक्षय काळे यांचा सत्कार करून शुभेच्छा व्यक्त केल्या. आमदार संजय मामा यांनी अक्षय ताकमोगे व अक्षय काळे यांच्या शिक्षणाविषयी जाणून घेतलं. यावेळी उपस्थित बाळासाहेब ताकमोगे (पी.एस.आय) रोपळे गावचे सरपंच लक्ष्मण लोंढे उपसरपंच श्रीपाद दळवी तानाजी दास,आजिनाथ गोडगे,मा.सरपंच धोंडीराम ताकमोगे,गोरख ताकमोगे,लक्ष्मण चोपडे,धनंजय ताकमोगे,देविदास ताकमोगे,अक्षय ताकमोगे(पीएसआय) यांचे वडील संतोष ताकमोगे,सरवदे भाऊसाहेब,प्रशांत करंडे,नवनाथ ताकमोगे,गणेश यादव, संतोष चोपडे भारत काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त : केंद्रप्रमुख पंडितराव पवळे सेवानिवृत्त

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : आपली शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ शासकीय सेवा पूर्ण करून जिल्हा परिषद शिक्षण विभागातून सेवानिवृत्त झालेले राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त वाजेगाव संकुलाचे केंद्रप्रमुख- पंडितराव पवळे यांचा ३१-जुलै रोजी सेवानिवृत्तीचा कार्यक्रम दि.१-ऑगस्ट रोजी ब्राह्मणवाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द लेखक तथा शिक्षण विस्तार अधिकारी- व्यंकटेश चौधरी, शिक्षण विस्तार अधिकारी- एम.एन. दूधमल, केंद्रप्रमुख-निरंजन भारती, शिक्षक नेते- दत्तप्रसाद पांडागळे उपस्थित होते. गटशिक्षणाधिकारी- बनसोडे व शिक्षण विस्तार अधिकारी- व्यंकटेश चौधरी यांच्या हस्ते सत्कारमूर्ती पंडित पवळे व त्यांच्या सुविद्या पत्नी अरुणाताई पवळे यांना कपड्याचा आहेर, सन्मानपत्र, ग्रंथ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करून निरोप देण्यात आला. पंडितराव पवळे यांचा सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात वडील रावजी पाटील आई जयाबाई यांच्या पोटी चिखली तालुका कंधार येथे दि.९-जुलै १९६६ रोजी जन्म झाला.त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण चिखली येथून तर माध्यमिक व पदवीचे एम.ए.मराठी एम.ए.शैक्षणिक संप्रेक्षण डी.एड बी.एड शालेय व्यवस्थापन पदविका



शिक्षणक्रम शिक्षण घेतले.ते पहिल्यांदा प्राथमिक शिक्षक म्हणून १-जानेवारी १९८८ ला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपरणवाडी केंद्र शेवडी (बा) ता. लोहा येथे पहिल्यांदा रुजू झाले.नंतर त्यांनी वडेपुरी ,विष्णुपुरी, वांगी गणपुर ,दाभड ,डेरला आदी ठिकाणी त्यांनी आपली सेवा बजावत ते वाजेगाव संकुलाचे केंद्रप्रमुख पदावरून ३१-जुलै रोजी ३६ वर्षे शासकीय सेवा पूर्ण करून ते सेवानिवृत्त झाले. पंडितराव पवळे यांनी मा.पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाने मराठा सेवा संघामध्ये नांदेड जिल्हा सचिव या पदावर अनेक वर्षे चळवळीत काम केले. तर पंडितराव पवळे यांनी राज्य शिक्षक पुरस्कार महाराष्ट्र शासन उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद नांदेड आदर्श शिक्षक पुरस्कार पंचायत समिती कंधार ग्राम गौरव पुरस्कार ग्राम शिक्षण समिती पिंपरणवाडी प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षक पुरस्कार यासह विविध संघटनेतून अनेक पुरस्कार यांनी प्राप्त केले आहेत. सेवानिवृत्ती बद्दल त्यांच्या पुढील कार्यासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष मा.पुरुषोत्तम खेडेकर राष्ट्रीय अध्यक्ष मा.कामाजीराव पवार संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष अँड.मनोज आखरे महासचिव सौरभ खेडेकर प्रवक्ते गंगाधर बनबरे सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष शेरा पाटील मधुकरराव देशमुख डॉ.पंजाबराव चव्हाण मा.शिक्षणाधिकारी शिवाजीराव खुडे,इंजि शिवाजीराजे पाटील प्रा.संतोष देवराये,पंडितराव कदम,संतोष गव्हाणे, डॉ.विठ्ठल पावडे मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नानाराव कल्याणकर उद्धवराव सूर्यवंशी सचिव सतीशकुमार जाधव रमेश पवार शिवाजीराव पाटील प्रल्हादराव धुरपडे, पंडितराव कदम जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा अरुणाताई जाधव विद्याताई पाटील सुरेखाताई रावणगावकर संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील जिल्हाध्यक्ष सुभाषराव कोल्हे भगवानराव कदम परमेश्वर पाटील इंजि. प्रविण जाधव जिल्हा प्रसिद्धी प्रमुख तथा पत्रकार बालाजी पाटील सिरसाट आदींनी त्यांचे स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# बीडमध्ये जिल्हास्तरीय खो खो पंच शिबिर संपन्न

## खेळाडूला न्याय देता आला पाहिजे- क्रीडाधिकारी पंडित चव्हाण

**(बीड-विवेक कुचेकर)**

बीड शहरातील राजश्री शाहू कन्या शाळा तेलगाव नाका येथे एमॅच्युअर खो खो असोशियन बीड यांच्या वतीने खो खो पंच शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून क्रीडा पंडित चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. बोलताना पंडित चव्हाण म्हणाले की, पंचांनी खेळवताना सामना निपक्षपातीपणे खेळवावा, पंचांनी योग्य निर्णय देणे आवश्यक आहे. यामध्ये पंचांचा निर्णय अंतिम राहील तसेच



पांचाना कोणत्याही खेळाडूला न्याय देता आला पाहिजे. पंचांची भूमिका निर्णायक असली पाहिजे असे बोलताना क्रीडाधिकारी पंडित चव्हाण म्हणाले. बीड जिल्ह्यातील पंच परीक्षा पास झालेल्या पांचाना प्रमापत्राचे वाटप करण्यात आले. खो खो खेळामध्ये नवीन बदल झालेले नियमची माहिती देण्यात आली. यावेळी कार्यक्रमासाठी बीडचे क्रीडाधिकारी पंडित चव्हाण, जे पी शेळके. मनोज जोगदंड, विजय जाहेर, योगेश सोळशे, बापूसाहेब तारूकर, नितीन येळवे, राष्ट्रीय प्रशिक्षक प्रफुल्ल हटवटे, अशोक चौरे आदीची कार्यक्रमासाठी उपस्थिती होती. यावेळी बीड जिल्ह्यातील परीक्षा पास झालेले सर्व परीक्षार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रांजणी केंद्रिय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची निवड



**जालना/असलम कुरेशी घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील केंद्रिय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची शालेय व्यवस्थापन समितीची निवड करण्यात आली. रांजणी येथील केंद्रिय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची शालेय व्यवस्थापन समितीची निवड करण्यासाठी शनिवारी पालकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी सुषमा विजय कांबळे, उपाध्यक्ष सचिन भास्कर पाटोळे, सदस्य गोविंद भाऊराव वरखडे, शुभांगी निलेश कचरे, मंगेश कुंडलिकराव देशमुख, कांताबाई तुकाराम पाटोळे, सय्यद कहेकशा हिदायत, सय्यद फारुख युसुफ, दौंड कालिंदा विलास, शेख सलाम रफिक, वैशाली गजानन गाढे, भारत आनंदा गवळी, कैलास गौतम जाधव आदींची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे राधाकिसन जाधव, प्रितम वरखडे, गोपिनाथ पाटोळे, हरिभाऊ पाटोळे, संतोष कुहिरे, उत्तम कसबे आदींनी अभिनंदन केले.**

# सावधान ! आष्टीत पकडले बनावट दुध

**(आष्टी प्रतिनिधी)**

तालुक्यातील आमिया टाकळी येथेअन्न औषध प्रशासनाने छापा मारून बनावट दुध बनविण्याचा साठा जप्त केला असून यामुळे आता भेसळयुक्त दुधाची विक्री अनेक किती ठिकाणी होते याचा तपास आता प्रशासन घेत आहे. बीड-जिल्ह्यात दुधाची होतं असलेली भेसळयुक्त विक्री आता चव्हाट्यावर येतं आहे. आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथे अन्न औषधं प्रशासन व पोलिसांनी संयुक्त कारवाया करत २०० पोत्यापेक्षा अधिक पावडरचा साठा जप्त केल्याचे कळते. काल रात्रीपासून हा साठा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. मागच्या काही दिवसापासून बीड जिल्ह्यात बनावट दुध विक्रीचा धंदा जोरात सुरु आहे. याबाबत अन्न औषधं प्रशासनाला माहिती मिळाल्यानंतर पोलिसांच्या समेवत टाकळी अमिया येथे छापा मारण्यात आला. यात २०० गोण्या पावडरच्या साठ्याच्या आढळून आल्या असून अजूनही साठा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. काल रात्रीपासून पोलीस आणि अन्न प्रशासन घटनास्थळी तळ ठोकून आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हा साठा अंबा[illegible]री यांचा असल्याचे कळते.याप्रकारणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

# मुसळधार पावसामुळे त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात रस्त्याला आले नदीचे स्वरुप

**नाशिक/सुरेश इंगळे**

नाशिक - गेल्या दोन दिवसापासून शहरासह त्रंबकेश्वर, इगतपुरी ,पेठ, सुरगाणा, दिंडोरी या तालुक्यात कालपासून पावसाने हाहाकार केला असून त्रंबकेश्वर मंदिर परिसरात रस्त्यामध्ये नद्यांचे रूप आल्याचे दिसत आहे. त्यामुळे दर्शनासाठी आलेल्या भाविकांची मोठी गैरसोय झाली आहे . नाशिक जिल्ह्यात गेल्या 24 तासात 80 मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे नाशिक शहराला पाणीपुरवठा करणारे त्र्यंबकेश्वर तालुक्यातील गंगापूर धरण 80 टक्क्याहून अधिक भरले आहे. तसेच त्रंबकेश्वर मंदिराच्या दक्षिण दरवाजाच्या पायऱ्यावरून मंदिर परिसरात



पाणी शिरले असून दक्षिण दरवाजा जवळील गायत्री मंदिर देखील पाण्याखाली गेले आहे. यावेळी पाण्याबरोबरच कचरा देखील वाहत आल्याचे दिसून आले, यामुळे देवदर्शनासाठी आलेल्या भाविकांची मोठी गैरसोय झाली. त्रंबकेश्वर मंदिरासह बाजारपेठ, मेन रोड गल्ली मध्ये देखील पाणी शिरले आहे . आजपासून श्रावण महिन्याला सुरुवात होत आहे. आज पहिला श्रावणी सोमवार आहे, श्रावणाच्या आदल्या दिवशीच बारा ज्योतिर्लिंग पैकी एक असणाऱ्या त्र्यंबकेश्वरच्या नगरीत मुसळधार पाऊस सुरू असल्याने भाविकांची गैरसव टाळण्यासाठी प्रशासनाला मोठे परिश्रम घ्यावे लागत आहेत .नाशिक शहर परिसरात मुसळधार पर्जन्यवृष्टी होत असल्यामुळे नाशिकचा सोमेश्वर धबधबा प्रवाहित झाल्याचे दिसून येत आहे. गंगापूर धरणाच्या पाणी पातळीत देखील वाढ झाल्याने धरणातून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. धरणातून नदीपात्रात येणारे पाणी आणि सोमेश्वर धबधबा परिसरात मिसळणारे पाणी यामुळे सोमेश्वर धबधबा धो धो कोसळताना दिसत आहे. यंदाच्या मोसमात पहिल्यांदाच सोमेश्वर धबधबा कोसळताना दिसत आहे. त्यामुळे धबधब्याचे फर्स्ट लोक बघण्यासाठी पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस तैनात करण्यात आलेले आहेत.

## रेल्वे अधिकारी श्री. कदम यांची मुलगी चि.सौ.का. योगिता आणि चि. अजिंक्य यांचा पर्यावरण पूरक लग्न सोहळा

**सोलापूर/विश्वास चोपडे**

आज मंगळवार दिनांक ०९/०७/२०२४ एक अत्यंत सुंदर आणि पर्यावरणाचा संदेश आणि लग्न असा दुग्धशर्करा सोहळा मोठ्या थाटात रेल्वेच्या ऑफिसर क्लब विजापूर रोड, येथे पार पडला. रेल्वेतील अधिकारी व सोलापूरचे पर्यावरण प्रेमी श्री शिवाजी कदम यांच्या यांच्या नियोजनात मुलीचा लग्न सोहळा पर्यावरण पूरक असावा असा उद्देश ठेवून एका विशिष्ट पैलू ने मोठ्या थाटात आणि उत्साहात संपन्न झाला. त्यांच्या कुटुंबीयांकडून सुबक अशा लग्नपत्रिका रुमालावर छापण्यात आल्या.



तसेच झाडे लावण्यासाठी त्याची जपून करण्यासाठी व प्रदूषण कमी करण्यासाठी फलक लावण्यात आले.तत्पूर्वी आदल्या दिवशी म्हणजे सोमवारी दोन्ही कुटुंबातील सदस्यांनी हळदी दिवशी रेल्वे कॉलनीत ५ झाडे लावण्यात आली. लग्नामध्ये ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी कुठल्याही प्रकारचा कर्कश आवाज करणारी साऊंड सिस्टिम व डीजे लावण्यात आला नाही. लग्न समारंभात जेवणाचा व पाण्याचा अपव्यय टाळण्याचा वाढपींना व पाहुण्यांना सल्ला देण्यात आला. सिंगल यूज प्लास्टिक चा वापर टाळण्यात आला, पिण्याचे पाणी कागदी गलासात दिले गेले. वीदाई समारोहसाठी बॅटरी गाडी (e vehicle) चा वापर करण्यात आला. लग्न समारंभात उपस्थित सर्वांसाठी "एक झाड" तसेच "झाडे लावा झाडे जगवा" अशी संदेश असणारी कापडी पिशवी देण्यात आली. या उपक्रमाचे दोन्ही कुटुंबातील पाहुण्यांनी उपस्थित अधिकारी वर्ग कर्मचारीवर आणि इतर सर्वांनी कौतुक केले. श्री कदम यांनी लग्न सोहळा पर्यावरण पूरक असावा असा संदेश सर्वांनाच देण्याचा प्रयत्न केला.

## खासदार सवरा यांनी घेतली रेल्वे मंत्र्यांची भेट



विक्रमगड/तुषार पाटील

पालघर लोकसभेचे नवनिर्वाचित खासदार डॉ. हेमंत सवरा सवरा यांनी रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव यांची जिल्ह्यातील समस्यांबाबत त्यांच्या दालनात भेट घेतली. भेटी दरम्यान बाहेर गावी जाणाऱ्या गाड्यांना पालघर लोकसभा क्षेत्रात थांबे देण्यात यावेत, त्याचप्रमाणे डहाणू-नाशिक रेल्वे व ठाणे-भिवंडी-नाशिक रेल्वे सुरू करण्याची मागणी केली. तसेच पालघर जिल्ह्यातील रेल्वेच्या इतर समस्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली.

## संतोषसिंग रहेकवाल यांची सुभेदार मेजर पदी पदोन्नती

**किल्ले धारूर/प्रतिनिधी**

किल्ले धारूर चे सुपुत्र संतोषसिंग भारतसिंग रहेकवाल यांची नुकतीच सुभेदार मेजर पदी पदोन्नती झाली आहे. या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. संतोषसिंग भारतसिंग रहेकवाल हे आदर्श क्रीडा शिक्षक भारतसिंग जयपालसिंह रहेकवाल यांचे सुपुत्र असून त्यांचे प्राथमिक शिक्षण जि.प.शाळा वकीलवाडी केज येथे झालेले आसून माध्यमिक शिक्षण जिल्हा परिषद माध्यमिक शाळा केज येथे झालेले होते. पुढे त्यांची भारतीय सैन्य अंतर्गत बॉईज स्पोर्ट्स कंपनी पुणे अंतर्गत रोइंग नौकायन क्रीडा प्रकारासाठी निवड झाली.या क्रीडा प्रकारात त्यांना पाच वेळा राष्ट्रीय स्पर्धेत पारितोषिक मिळाले व दोन वेळा आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. नंतर क्रीडा कोठयातून भारतीय सैन्यदलात त्यांची भरती झाली.२५ वर्ष सेवा केल्यानंतर त्यांची आता सुभेदार मेजर पदी पदोन्नती झाली आहे. पदोन्नती बाबतचे सन्मानाचे अशोक स्तंभ चिन्ह कर्नल विशाल पाठक साहेब व वडील भारतसिंग रहेकवाल यांच्या शुभ हस्ते व आई सौ.शकुंतला व पत्नी सौ.पुजा यांच्या सह कुटुंबीयांचे समक्ष लावून बॉम्बे इंजिनीअरींग ग्रूप पुणे येथे त्यांना सन्मानित करण्यात आले.



पदोन्नती नंतर माध्यमांशी बोलताना सुभेदार मेजर संतोषसिंग रहेकवाल म्हणाले की, मला माझे वडील आदर्श क्रीडा शिक्षक भारतसिंग रहेकवाल,प्रा.हनुमंत भोसले,प्रा.ईश्वर मुंडे यांचे मार्गदर्शन लाभलेले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असून शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व विद्यार्थ्यांनी प्रमाणीकपणे प्रयत्न केले तर ग्रामीण विद्यार्थी नक्कीच सर्वच क्षेत्रात यशस्वी होतात.

## श्रावणमास पर्व श्री केदारेश्वर मंदिर व परिसरात नाथ शिक्षण संस्थेकडून आकर्षक रोषणाई व फुलांची सजावट

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील जागृत देवस्थान श्री केदारेश्वर मंदिर व परिसरात राज्याचे कृषीमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ शिक्षण संस्थेच्या वतिने श्रावणमास पर्व निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली असल्याची माहिती नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे यांनी केले आहे. सोमवार दि.०५ ऑगस्ट पासून पवित्र श्रावणमास महिन्यास सुरुवात होत आहे. अंबाजोगाई



शहरातील जाग्रत देवस्थान श्री केदारेश्वर मंदिरात दर्शन घेण्यासाठी श्रावणमासासात मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ शिक्षण संस्थेच्या कडून श्री केदारेश्वर मंदिरात मनमोहक विद्युत रोषणाई, पुष्पसजावट करण्यात आली आहे. विविध फुलांच्या सजावटीने बहरले असून अत्यंत आकर्षक विद्युत रोषणाई सजावट व विविध आकर्षक फुलांची आरास मंदिर परिसर,गाभारा व सर्व ठिकाणी करण्यात आली आहे. हर हर महादेवचा जयघोष करत श्री केदारेश्वर मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या गर्दीने मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण झाले आहे. श्रावणमास पर्व : श्री केदारेश्वर मंदिर व परिसरात प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी नाथ शिक्षण संस्थेकडून आकर्षक रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली असल्याची माहिती नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे यांनी दिली आहे.

# एकतर हप्ता वसुली करा किंवा नोकरी-नितीन गडकरी

**प्रतिनिधी/नागपूर**

जनतेकडून टॅक्स घेता सुविधा देत नाही, अतिक्रमण न काढण्यासाठी हप्ते घेता, हप्ता हवा की नोकरी असा थेट इशारा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना दिला तर रक्षा खडसे यांनी खड्डे बुजवणार नसाल तर गडकरींना पत्र लिहून कार्यमुक्त करण्याचा इशारा दिला. यामुळे सरकारी अधिकाऱ्यांच्या कामचुकारीचा फटका जनतेला तर बसतोच पण मंत्र्यांना देखील मनस्ताप होत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचा अधिकाऱ्यांना दम सरकारी काम आणि सहा महिने थांब हे वाक्य आपण अनेकदा ऐकलं असेल. सरकारी कार्यालयात आपली फाईल पुढे सरकवण्याकरता अनेकांच्या चपला झिजून जातात असा अनुभव नागरिकांना आहे. मात्र, आता हा अनुभव सामान्य नागरिकांपुरता मर्यादित राहिलेला नसून हा अनुभव आता खुद्द सरकारमधील मंत्र्यांना यायला लागलेला आहे. मोदी सरकारमधील सर्वात कार्यक्षम मंत्री म्हणून ओळख असलेल्या नितीन गडकरींना देखील कर्मचाऱ्यांच्या कामचुकारपणाचा आज फटका बसला. नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयात नितीन गडकरी यांनी आज जनता दरबार घेतला होता. या जनता दरबारात हजारो नागपूरकरांनी आपल्या समस्येचा पाढा गडकरींसमोर वाचला. हा पाढा पाहून अखेर गडकरींचा संताप अनावर झाला. नागपूर शहरातील सीताबर्डी परिसरातील अतिक्रमण काढलं जात नाही आणि ते अतिक्रमण न काढण्यासाठी मनपा कर्मचारी हप्ता घेतात. एकतर हप्ता वसुली करा किंवा नोकरी करा असा



कडक इशारा या जनता दरबारात नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना दिला. खासदार रक्षा खडसे संतापल्या असाच एक फटका जळगावातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित 'दिशा' (जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती) बैठक केंद्रीय क्रीडा मंत्री रक्षा खडसे यांना देखील बसला. राष्ट्रीय महामार्गाची दुरावस्था, रेल्वेची प्रलंबित कामे यासह महावितरण व शेतकऱ्यांच्या पिक विम्याच्या रखडलेल्या रकमेच्या विषयावरून बैठक चांगलीच गाजली. महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्याने परस्पर खड्डा बुजवल्याची माहिती दिल्याने रक्षा खडसे यांचा बैठकीत संताप झाला. तुमच्याकडून काम होत नसेल तर तसे सांगा गडकरी साहेबांना पत्र देऊन तुमची बदली करा किंवा तुमच्यावर कारवाई करायला सांगते. अशा शब्दात विभागाच्या अधिकाऱ्याची झाडाझडती खासदार खडसे यांनी घेतली. नितीन गडकरींनी अधिकाऱ्यांना धारेवर धरण्याचा हा काही पहिला प्रसंग नाही. याआधी देखील नितीन गडकरी यांनी सचिव दर्जांच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरलेलं आहे. एका बाजूने सरकारकडून जनतेला सोयीसुविधा देण्याच्या नावानं अनेक कर लादले जातात. दुसऱ्या बाजूने जनतेला त्यांच्या समस्या सरकार आणि अधिकाऱ्यांकडून सोडविला जातील अशी माफक अपेक्षा असते. मात्र तसं होताना दिसत नाहीये. सरकारचं अधिकाऱ्यांवरील नियंत्रण सुटलं का असा प्रश्न या निमित्ताने उभा होतो. मात्र, मंत्र्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या या भाऊ गर्दीत सामान्य जनतेचे प्रश्न मात्र जिथच्या तिथेच राहतात.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

मंगळवार ५ ऑगस्ट २०२४


या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# सेल्फीचा नाद युवतीला पडला भारी, शंभर फूट दरीत कोसळली

मोबाईल आता सर्वात आवश्यक घटक बनला आहे. काही जण मोबाईल शिवाय काही मिनिटेसुद्धा राहू शकत नाही. मोबाईलमध्ये असलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या सुविधांमुळे काही गोष्टी कालबाह्य होत आहे. मोबाईलमध्ये कॅमेऱ्या आल्यामुळे अनेकांकडे दिसणारे कॅमेरे अडगळीत पडले आहे. कॅमेऱ्यात असणाऱ्या सेल्फी प्रकाराचा नाद युवक-युवतींना मोठ्या प्रमाणात आहे. मग ही सेल्फी काढण्यासाठी काही जण वेगवेगळ्या प्रकारचे धाडस करतात. कधी पाण्याच्या प्रवाहाजवळ सेल्फी काढतात, कधी डोंगर दऱ्यांमध्ये सेल्फी काढली जाते. हा प्रकार जीवावर बेतणाराही ठरला आहे. साताऱ्यातील बोरने घाटात असाच प्रकार घडला. पुण्यातील एका युवतीने डोंगराच्या किनाऱ्यावर सेल्फी काढण्याचे धाडस केले अन् ती शंभर फूट खोल दरीत कोसळली. काय घडला प्रकार

पुण्यातील वारजे येथील नसरीन अमीर कुरेशी (वय २९) काही जण साताऱ्यातील संगमनगरमध्ये कारने आले होते. हे सर्वजणांनी ठोसेघर येथे भटकंती केली. परंतु ठोसेघर धबधबा बंद होता. त्यामुळे बोरणे घाटात आल्यावर सर्वजण गाडीतून उतरुन फोटोसेशन करु लागले. नसरीन सेल्फी घेत असताना



अचानक तिचा तोल गेला. त्यानंतर ती शंभर फूट खोल दरीत पडली. एका झाडाला ती अडकली. यामुळे तिचा जीव वाचला. युवती रुग्णालयात दाखल नसरीन कुरेशीसोबत आलेल्या मुलांनी ही माहिती सातारा पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी शिवेंद्रसिंहराजे ट्रेकर्सच्या युवकांना बोलवले. त्यांनी पोलिसांच्या मदतीने घाटात मदतकार्य सुरू केले.

## झन्ना मन्ना जुगार अड्ड्यावर पैठण पोलिसांचा छापा: सहा जण गजाआड

छत्रपती संभाजीनगर (चैताली औटे)
पैठण शहरातील उच्चभ्रू वस्ती गोपाल नगरात अट्टल जुगारी अयुब मोहम्मद पठाण सह अन्य सहा जुगारींना पैशावर झन्ना मन्ना आणि तिरट खेळतांना पैठण पोलिसांनी रंगात पकडले असून मुंबई जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करून सहा आरोपींना अटक करण्यात आले आहे. नंतर आरोपींना वैयक्तिक जातमुचलका वर सोडून देण्यात आले. याबाबत थोडक्यात माहिती अशी की ,पैठण येथील गोपाल नगर प्रभागात अट्टल जुगारी अयुब मोहम्मद पठाण यांच्या गुप्त ठिकाणी५२ पत्त्यांचा तिरट, झन्ना- मन्ना नावाचा जुगाड सुरु असल्याची माहिती गुप्त खबर्यामार्फत पैठण पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचला आणि मोठ्या शिताफीने रोख रक्कम ९ हजार ३१० रुपये आणि ५२ पत्त्यांचा संच आणि आरोपी नवाज पठाण,अयुब मोहम्मद पठाण, शिवा बबन भवरे, नवाब मुन्शी शहा,विठ्ठल पंढरीनाथ नवले ,सचिन आसाराम मोटकर इत्यादींना अटक करून न्यायालयात हजर केले असता मुंबई जुगार प्रतिबंधक कायद्याने वैयक्तिक जातमुचलका वर सोडवण्यात आले. या कारवाईत पोलीस हेड कॉन्स्टेबल राजेश आटोळे ,महेश माळी यांनी जोरदार कामगिरी बजावली.

## विभागीय कृषी सह संचालक यांचा सोयगाव दौरा

**छत्रपती संभाजीनगर (चैताली औटे)**

सोयगाव परिसरात खरीप हंगामात विविध तंत्रज्ञानाचा वापर करून पेरण्या केलेल्या पिकांची रविवारी( ता.०४) विभागीय कृषी सह संचालक डॉ तुकाराम मोटे यांनी पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले यामध्ये त्यांनी जरंडी ता सोयगाव येथे सायंकाळी पाच वाजता हेमंत पाटील यांच्या गट क्र ३८० शेतामध्ये शून्य



मशागत लागवड तंत्रज्ञाने लागवड केलेल्या कपाशीची पाहणी करून मार्गदर्शन केले फळबाग मध्ये ही शून्य मशागत लागवड करता येते या तंत्रज्ञानाच्या लागवडीमुळे मजुरांचा खर्च वाचतो असे सांगून तण नियंत्रण बाबत विभागीय सह संचालक डॉ तुकाराम मोटे यांनी मार्गदर्शन केले दरम्यान कृषी भूषण शेतकरी रवींद्र पाटील यांच्या शेतातील सोयाबीन-तूर आंतर पिकांची लागवड या नावीन्य पूर्ण प्रयोगाची पाहणी करून मधुकर लोटन पाटील यांच्या स्वदेशी कपाशी लागवडीची पाहणी केली तसेचमौजे जरंडी येथे अति घन पद्धतीने लागवड केलेल्या पेरू बागेची पाहणी केली तसेच मोसंबी बागे मध्ये जास्तीत जास्त फळधारणा होण्याबाबत मार्गदर्शन केले यावेळी हेमंत पाटील मधुकर पाटील कृषी भूषण शेतकरी रवींद्र पाटील,प्रदीप पाटील डॉ अविनाश पाटील,नरेंद त्रंबक पाटील ,विजय पाटील,दिलीप पाटील कृषी पर्यवेक्षक समाधान चौधरी मयूर बारे आदींची उपस्थिती होती..

## भारतीय सैन्यदलातून सेवानिवृत्त सैनिकांची शहरात घोड्यावर मिरवणूक

**छत्रपती संभाजीनगर ( चैताली औटे)**
सोयगाव शहरातील गजानन लाड यांची रविवारी सायंकाळी सेवानिवृत्त नंतर सोयगाव शहरात आगमन होताच सायंकाळी सहा वाजता सोयगाव व आमखेडा गावात घोड्यावर मिरवणूक काढण्यात आली होती सोयगाव पोलीस ठाणे पासून सुरू झालेली मिरवणूक सोयगाव बस स्टॅन्ड,गजानन महाराज मंदिर मार्गे शिवाजी नगर आदी भागांतून आमखेडा गावात पोहचली रात्री उशीरा पर्यंत सुरू होती २४ वर्ष भारतीय सैन्य दलात सेवा बजावून सोयगाव शहरातील गजानन शंकर लाड



हे रविवारी सेवानिवृत्त होऊन सोयगाव येथे आले असता गावातील त्यांच्या मित्र परिवाराने त्यांची वाजत गाजत घोड्यावर बसवून सोयगाव व आमखेडा या दोन्ही गावातून मिरवणूक काढली ठिकठिकाणी गावातील महिलांनी त्यांचे औक्षण करून त्यांच्या कार्याला मानवंदना दिली सन सन २०००मध्ये वयाच्या २१ व्या वर्षी गजानन लाड हे भारत मातेचे सेवेसाठी भारतीय सैन्य दलात रुजू झाले पुणे येथे त्यांची ट्रेनिंग संपल्यानंतर पहिली सेवा त्यांची पंजाब येथील भटिंडा येथे झाली तेथे काही काळ सेवा बजावल्यानंतर त्यांची कारगिल येथे बदली झाली २४ वर्षाच्या सेवाकाळात त्यांनी तब्बल १२ वर्ष हा काळ भारतीय सीमेवर घालवला. पोखरण व कारगिल येथील त्यांचा सेवाकाळ हा खूप संघर्षमय होता असे त्यांनी सांगितले या मिरवणुकीमध्ये त्यांचे वर्गमित्र कुटुंबातील सर्व सदस्य व गावकरी तसेच सर्व समाज बांधव एकत्रित आल्याने त्यांच्या मिरवणुकीला सोयगाव शहरातील नागरिक उपस्थित होते.



वाशी प्रतिनिधी :धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार तानाजीराव सावंत साहेब यांच्यावतीने पारगाव मध्ये भव्य कामगार नोंदणी मेळावापारगाव मध्ये कामगार नोंदणी मोफत जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. तरीही पारगाव मधील सर्व नागरिकांनी लवकरात लवकर नोंदणी करून घ्यावी. राजेभाऊ कोळी

## राज्यातील जमिनींची संयुक्त मोजणी व्हावी म्हणून कांतीलाल गि-हे यांचे चोभानिमगांव येथे आमरण उपोषण

किरण जावळे आष्टी/लोकांकीत वृत्तसेवा
आष्टी-राज्यातील गावोगावी गावठाणातील व शासनाने संपादित केलेल्या जमिनीवर मोठ मोठ्या लोकांनी मनगट शाहीने शासनाचे क्षेत्र व गावठाणातील क्षेत्र ताब्यात घेतले आहे. सदरील शासनाच्या क्षेत्राचा उपयोग हा सर्वसामान्य साठी असून त्याचा उपयोग लोकांना घेता येत नाही त्यामुळे सर्व शासकीय मालकीच्या जमिनीची संपूर्ण मोजणी १९३० सारखी पूर्ववत करणे आवश्यक आहे. राज्यातील जमिनीचे संयुक्त मोजणी व गावठाण मोजणी व्हावी या मागणीसाठी जमाबंदी संचालक पुणे यांनाही निवेदन दिले व या निवेदनावर कुठलीच




कारवाई न झाल्याने आष्टी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल गि-हे यांनी १ ऑगस्ट पासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यांनी जमाबंदी संचालक पुणे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की मी चोभानिमगांव येथील रहिवासी असून माझ्या नावे चोभानिमगांव येथे शेतजमीन असून शेजारील लोकांनी अतिक्रमण केले असून माझे जमिनीच्या क्षेत्राच्या सर्वे नंबर बांध हे जुन्याकाळी सहा फुटाचे होते. त्यावेळी मला शेतात येण्या-जाण्यासाठी रस्ता उपलब्ध होता परंतु अलीकडील काळामध्ये सहा फुटाचा बांध कोरुन अतिक्रमण करून माझ्या जमिनीवर अतिक्रमण करण्याच्या तयारीत आहेत. तसेच गावातील व राज्यातील हीच परिस्थिती आहे गायोगावी गावठाणातील व शासनाने संपादित केलेल्या जमिनीवर मोठ्या लोकांनी मनगटशाहीने शासनाचे क्षेत्र व गावठाणातील क्षेत्र ताब्यात घेतले आहे सदरील शासनाच्या क्षेत्राच्या उपयोग हा सर्वसामान्य जनतेसाठी असून त्याचा उपयोग सामान्य लोकांना घेता येत नाही त्यामुळे सर्व शासकीय व स्वतःच्या मालकीच्या जमिनी संपूर्ण मोजणी १९८० मध्ये झालेली होती त्यानंतर १९३० मध्ये अमलात आली होती त्याकरता महाराष्ट्र शासनाने पुन्हा १९३० सारखी पुर्ववत मोजणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यातील सर्व पिडीत जनतेस न्याय मिळेल त्यामुळे महाराष्ट्र शासनाने पुन्हा संयुक्त मोजणी करून महसूल अधिनियमनुसार करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल गि-हे यांनी केली असून यासाठी १ ऑगस्टपासून चोभानिमगांव येथे आमरण उप-पोषण सुरू केले आहे. यांच्यासह ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शवला आहे. भारतीय कॉंग्रेस आष्टी तालुकाध्यक्ष रविंद्र ढोबळे यांनी उपोषणांस जाहिर पाठींबा दर्शवला आहे

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com